# <u>फलटण येथील ३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी फलटण यांचे न्यायालयात</u>

(पिठासिन अधिकारी पी. एच. पाटील)

संक्षिप्त फौ.ख.क्र.११७१/२२

१. गुन्हा घडल्याची तारीख : २९/६/२०२२

२. गुन्हा नोंदण्याची तारीख : २९/६/२०२२

३. फिर्यादीचे नाव व पत्ता पोलीस निरीक्षक
फलटण शहर पोलीस स्टेशन

४. आरोपीचे नाव :. विजय धोंडीराम मुळीक
वय.५० वर्षे, धंदा–चालक
रा.धुळदेव, ता. फलटण,

आरोपीविरूध्द दोषारोप ठेवण्यात येतो की, मे. हुजुर कोर्टाच्या स्थळ हददीत, मौजे नाना पाटील चौक फलटण येथे सार्वजनिक रोडवर दि.२९/६/२०२२ रोजी २०–०० वाजेच्या सुमारास तुम्ही तुमचे ताब्यातील आयशर ९०९ टेम्पो क्र.एमएच/११एएल/३१५१ हे चार चाकी वाहन सार्वजनिक रोडवर वाहतुकीस व रहदारीस अडथळा निर्माण होईल असे प्ध्दतीने धोकादायक स्थितीत उभे केले म्हणुन भा.द.वि.कलम २८३ प्रमाणे गुन्हा केल्याची तोहमत आहे.

दि.११/०२/२०२३ (श्री पी.एच.पाटील)
फलटण. ३रे प्र.न्याय.फलटण

प्र'न.१ तुम्हाला खटल्यातील पोलीस कागदपत्रे मिळाली काय?
उत्तर होय.
प्र'न२ तुम्हाला गुन्हयाचा तपशील समजला काय?
उत्तर होय.
प्र'न३ तुम्हा गुन्हा कबुल आहे काय?
उत्तर मला गुन्हा कबुल आहे.

दि.११/२/२०२३ .........
आरोपीची सही.

समोर,

(श्री.पी. एच. पाटील)
३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी फलटण.

## न्यायनिर्णय

आरोपीने गुन्हा कबुल करुन त्याने हा पहिलाच गुन्हा आहे, तो त्याचे कुटुंबातील एकमेव उत्पन्न मिळविणारा कर्ता आहे, त्यास शिक्षा झालेस त्याचे कुटुंबाची आर्थीक कोंडी होणार आहे, त्याचेवर दया दाखवुन त्यास कमीत कमी दंड करुन मुक्त करावे अशी विनंती केली. आरोपीचे शिक्षेबद्यल निवेदन ऐकले. त्याने कमीत कमी शिक्षा होण्याची विनंती केली. आरोपीच्या अर्जाचा व निवेदनाचे अवलोकन केले असता, आरोपी स्वत:हुन गुन्हा कबुल करत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. वरील सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

आरोपी विजय धोंडीराम मुळीक रा.धुळदेव,ता. फलटण यानी भा.दं.वि.कलम २८३ प्रमाणे गुन्हा केला म्हणून त्यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) प्रमाणे रुपये २००/-(रु.दोनशे फक्त) इतका दंड करणेत येत आहे, दंड न भरल्यास त्याने एक दिवस साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

फलटण. (श्री.पी.एच.पाटील)
दिनांक :११/०२/२०२३ ३रे प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी फलटण.

PANKAJ HILAL PATIL
Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
DN: cn=PANKAJ HILAL PATIL, ou=BOMBAY HIGH COURT, o=BOMBAY HIGH COURT, st=MAHARASHTRA, c=IN
Date: 2023.02.11 14:59:45 +0530